लोकमत

दोन प्रमुख कारणांमुळे मध्य रेल्वेचा नकार

# जळगाव ते पुणे 'वंदे भारत'चा प्रस्ताव, पण...

भूषण श्रीखंडे
लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** देशात अत्याधुनिक वंदे भारत ट्रेन ही गाडी अनेक मार्गावर धावत आहे. तसेच मुंबई या महत्वाच्या रेल्वे स्थानकावरून राज्यात पाच ठिकाणी वंदे भारत ट्रेन राज्यात सुरू आहे. जळगाव ते पुणे मार्गावर वंदे भारत ट्रेन चालविण्याबाबत भुसावळ रेल्वे विभागाने मध्य रेल्वे प्रशासनाला प्रस्ताव दिला होता. मात्र मध्य रेल्वे लाईनवरील गाड्यांचे व्यस्त वेळापत्रक, तसेच तिसऱ्या रेल्वे लाईनचे काम बाकी असल्याने ही रेल्वे गाडी सध्या तरी चालविणे शक्य नसल्याने वंदे भारत ट्रेनने प्रवास करण्यासाठी जळगाव जिल्ह्यातील प्रवाशांना अजून प्रतीक्षा करावी लागणार आहे.

वंदे भारत ही अत्याधुनिक ट्रेन सध्या



## हुतात्मा एक्स्प्रेस बंद

- पुणे येथे जाण्यासाठी भुसावळ रेल्वे जंक्शनवरून सुटणारी हुतात्मा एक्स्प्रेस ही एकच गाडी आहे.
- मात्र अडीच महिन्यांपासून ही गाडी इगतपुरीपर्यंतच धावत आहे.
- या रेल्वे गाडीने पुणे येथे

देशभरात १४ मार्गावर धावत आहे. यापैकी मुंबई ते अहमदाबाद, मुंबई ते साईनगर शिर्डी, मुंबई ते सोलापूर आणि नागपूर ते बिलासपूर, मुंबई ते गोवा या मार्गावर धावत आहे. भुसावळ येथून पुणे मार्गावर वंदे भारत ट्रेन चालू करावी, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात आली होती. याबाबत भुसावळ रेल्वे विभागाने मध्य रेल्वे विभागाकडे भुसावळ-पुणे दरम्यान वंदे भारत ट्रेन चालविण्याबाबत प्रस्ताव दिला होता. परंतु मुंबई ते भुसावळ दरम्यानचे रेल्वे गाड्यांचे व्यस्त वेळापत्रक तसेच तिसऱ्या लाईनचे पाचोरा ते नांदगाव पर्यंतचे काम अजून बाकी असल्यामुळे तूर्तास वंदे भारत ट्रेन चालविणे शक्य नसल्याचे रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

जाणाऱ्या प्रवाशांना दुसऱ्या रेल्वे गाड्यांचे आरक्षित तिकीट लवकर मिळत नसल्याने महामंडळाची एसटी बस अथवा खासगी ट्रॅव्हलने जादा पैसे देऊन जावे लागत आहे.

## पुण्याला सहा गाड्या नियमित धावणाऱ्या

भुसावळ रेल्वे स्थानकावरून पुणे येथे नियमित धावणाऱ्या गाड्यांची संख्या सहा आहे. हुतात्मा एक्स्प्रेस ही दोन महिन्यापासून बंद आहे. तर महाराष्ट्र एक्सप्रेस, आझाद हिंद, झेलम एक्सप्रेस, गोवा एक्सप्रेस, दानापूर-पुणे सुपर फास्ट एक्सप्रेस या गाड्या नियमित धावत आहे. तर २४ गाड्या साप्ताहिक धावतात.

भुसावळ ते पुणे दरम्यान वंदे भारत ट्रेनचा प्रस्ताव मध्य रेल्वे विभागाला पाठविला होता. परंतु, मध्य रेल्वे लाईनवरील गाड्यांचे व्यस्त वेळापत्रक व रेल्वे लाईनवरील देखभाल-दुरुस्तीमुळे भुसावळ ते पुणे वंदे भारत ट्रेन सध्या चालविणे शक्य नाही. - **ईती पांडे**, डीआरएम, मध्य रेल्वे भुसावळ विभाग

Hello Jalgaon
Page No. 1 Sep 20, 2023
Powered by: erelego.com